# 'अनुकंपा'साठीही जुनेच पेन्शन


रमेश खोकराळे
ramesh.khokrale@timesofindia.com


**मुंबई** : शासकीय सेवेतील नियुक्तीचा आदेश १ नोव्हेंबर २००५ या तारखेनंतरचा असला तरी भरतीप्रक्रिया त्यापूर्वीच सुरू झालेली होती, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू होईल, हे न्यायनिवाड्यांतून स्पष्ट झालेले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे 'अनुकंपा'वरील अशा कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजनाच लागू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्र सरकारने २००३मध्ये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (डीसीपीएस) ही नवी पेन्शन योजना आणल्यानंतर राज्य सरकारनेही त्यातील तरतुदी स्वीकारून ३१ ऑक्टोबर २००५ रोजीच्या जीआरद्वारे १ नोव्हेंबर २००५पासून आपल्या कर्मचाऱ्यांना 'डीसीपीएस' योजना लागू केली. कालांतराने राज्य सरकारने २१ ऑगस्ट २०१४ रोजी 'डीसीपीएस'ऐवजी केंद्र सरकारने आखलेली 'नॅशनल पेन्शन स्कीम' (एनपीएस) स्वीकारली. मात्र, या योजनांपेक्षा जुनी पेन्शन योजनाच (ओपीएस) अधिक लाभदायी असल्याने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा त्यासाठी आग्रह कायम राहिला.

डीसीपीएस लागू होण्यापूर्वीच नोकरभरतीची (पान १२वर)

## 'त्या' कर्मचाऱ्यांबाबत उच्च न्यायालयाचा निर्वाळा



# ‘अनुकंपा’साठीही जुनीच पेन्शन




### ‘तो’ निधी वळता करण्याचा आदेश

‘याचिकाकर्त्यांची नावे जुन्या पेन्शन योजनेत समाविष्ट करण्याची प्रक्रिया राज्य सरकारच्या प्रशासनांनी पूर्ण करावी. तसेच पूर्वी डीसीपीएस (एनपीएस) योजनेत त्यांच्या वेतनातून रक्कम कापली असल्यास ती सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत वळती करावी’, असेही खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

(पान एकवरून)

प्रक्रिया सुरू झाली आणि नियुक्ती १ नोव्हेंबर २००५नंतर झाली, अशी स्थिती असलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या खूप मोठ्या प्रमाणात याचिका न्यायालयात दाखल झाल्या. त्यात वेगवेगळ्या खंडपीठांनी कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिले. त्यामुळे त्याविषयीचे कायदेशीर चित्र स्पष्ट झाले. परंतु, ‘अनुकंपा’ तत्त्वावरील अशा कर्मचाऱ्यांचा याविषयीचा प्रश्न अनुत्तरित राहिला होता. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवरील सेवेत असलेल्या त्या-त्या कर्मचाऱ्याचा मुलगा किंवा त्या-त्या कर्मचाऱ्याची पत्नी या नात्याने अनुकंपा तत्त्वावर शासकीय नोकरी मिळालेल्या १७ जणांनी याप्रश्नी अॅड. सुरेश पाकळे यांच्यामार्फत रिट याचिका करून राज्य सरकारच्या निर्णयाला सन २०२३मध्ये आव्हान दिले होते. त्याविषयीच्या अंतिम सुनावणीअंती न्या. रवींद्र घुगे व न्या. गौतम आंखड यांच्या खंडपीठाने नुकताच हा निर्णय दिला आहे.

‘आमच्या नियुक्त्या अनुकंपा तत्त्वावर असल्या तरी त्या मंजूर पदांवरच आहेत. त्यामुळे आम्हालाही महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ हे नियमच लागू होतात. त्यामुळे आम्हालाही जुनी पेन्शन योजना आणि सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजनेचे लाभ मिळायला हवेत. आम्हाला त्यापासून वंचित ठेवून डीसीपीएस या पेन्शन योजनेत सक्तीने ठेवून राज्य सरकार आमच्यावर अन्याय करत आहे. तसेच राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ व १६ अन्वये असलेल्या आमच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करत आहे. पेन्शन हा निवृत्त कर्मचाऱ्याचा मूलभूत अधिकार असतो. ते काही नोकरीवर ठेवणाऱ्या संस्थेच्या मर्जीवर किंवा सरकारच्या विशेषाधिकारावर अवलंबून नसते. यासंदर्भात खुद्द सर्वोच्च न्यायालयानेही चार दशकांपूर्वीच निर्णायक निवाडा दिलेला आहे’, असा युक्तिवाद मांडण्यात आला. तर ‘हे कर्मचारी सरळसेवा भरती प्रक्रियेतून निवडून आलेले नसून, अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत आलेले आहेत. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम लागू होऊ शकत नाही’, अशी भूमिका मांडून सरकारने याचिकेला तीव्र विरोध दर्शवला. मात्र, ‘राज्य सरकारने १ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या जीआरद्वारे ओपीएस व डीसीपीएस या योजनांच्या हक्काबाबत गट केलेले आहेत. त्याप्रमाणे १ नोव्हेंबर २००५पूर्वी निवड यादीत अंतर्भूत असलेल्या आणि १ नोव्हेंबर २००५नंतर नियुक्ती झालेल्या अनुकंपा तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना डीसीपीएस लागू होणार नसल्याचे स्पष्ट होते’, असे खंडपीठाने निर्णयात स्पष्ट केले. तसेच त्यांचा ‘ओपीएस’मध्ये समावेश करण्याचे निर्देश दिले.